-अ-

# राष्ट्रीय लोक अदालत

## दिवाणी व फौजदारी न्यायालय -

( विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ ( केंद्रीय कायदा ) चे कलम १९ नुसार आयोजीत )

निशाणी क्र. ....e....

प्रकरण क्रमांकः - रे मू न २३ /२०२६

~~अर्जदार~~/ ~~फिर्यादी~~/ वादीचे नाव - श्री. संजय विठ्ठल लांबोरे

~~गैरअर्जदार~~/~~आरोपी~~/प्रतिवादीचे नाव - परशुराम भगवान लांबोरे

न्यायालयाचे नावः- देवगड दिवाणी न्यायालय

( १ ) न्यायीक अधिकारी यांचे नांव - श्री. श्रीकांत शिवपुत्र पचंडी

( २ ) पॅनल सदस्यः - ~~श्री.~~ ॲड. सं. म. गोरे

### अवार्ड

दोन्ही पक्षांमधील वाद सामंजस्याने मिटवण्यासाठी प्रस्तुतचे प्रकरण हे आज रोजी राष्ट्रीय लोक अदालत समोर सादर करण्यात आले होते. उभय पक्षकारांनी या लोक अदालतसमक्ष तडजोड केली आणि त्यांच्या तडजोडीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेतः

१. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना वादीचा दावा मान्य व कबुल आहे.

२. दावा मिळकत क्र. १ व २ यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा १/२ हिस्सा आहे. मात्र सदर दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचा १/२ हिस्सा दिल्यास सदर मिळकतीच्या क्षेत्रात दोन तुकडे होण्याच्या शक्यता आहे. त्यामुळे दावा मिळकतीपैकी एक एक मिळकती नेमणून दिल्यास वादी व प्रतिवादी यांना दावा मिळकतीचे एक क्षेत्रीय मिळून भविष्यात वाद टाळता येतील व मिळकतीचा विकास करणे सोपे होणारे आहे.

३. तरी वरील भुमापन क्रमांक व उपविभाग ८/१३ या दावा मिळकत क्र. १ मधील संपूर्ण क्षेत्रापैकी खाते क्र. ५२४ यातील प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावासमोर असलेले क्षेत्र ०.०१.०० व पो. ख. ०.०६.१८ एकूण क्षेत्र ०.०७.१८ एवढे क्षेत्र हे वादीच्या हिस्सेस नेमून दिले आहे व भुमापन क्रमांक व उपविभाग ५१/३७ दावा मिळकत क्र. २ मधील संपूर्ण क्षेत्र हे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे हिस्सेस नेमून दिले आहे.

४. प्रस्तुत तडजोड हुकूमनाम्याप्रमाणे वादीने तलाठी मौजे सोमलेवाडी यांचेकडे वर्दी अर्ज दावा मिळकतीतील सातबारा सदरी वादी यांनी त्यांचे नाव वरील भुमापन क्रमांक व उपविभाग ८/१३ या दावा मिळकत क्र. १ मधील संपूर्ण क्षेत्रापैकी खाते क्र. ५२४ यातील प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावासमोर असलेले क्षेत्र ०.०१.०० व पो. ख. ०.०६. १८ एकूण क्षेत्र ०.०७.१८ एवढया क्षेत्रास नाव नोंदवून घेण्याचे आहे व भुमापन क्रमांक व उपविभाग ५१/३७ दावा मिळकत क्र. २ मधील संपूर्ण क्षेत्रास प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावे नोंद करून घेण्याचे आहे तसेच त्यास प्र.वादी क्र. १ ते ४ यांनी आपली संमत्ती देण्याची आहे.

पक्षकारांना सुचीत करण्यात येते की, त्यांनी कोर्ट फी (भरली असल्यास) कायद्याप्रमाणे व नियमाप्रमाणे त्यांना परत करण्यात येईल.

सही-.........................................

वादीचे वकील

वादी

श्री. संजय विठ्ठल लांबोरे

प. भ. लांबोरे

प्रतिवादी क्र. १ – परशुराम भगवान लांबोरे

प्रतिवादी क्र. २ – शांताराम भगवान लांबोरे

प्रतिवादी क्र. ३ – भाउ भगवान लांबोरे

प्रतिवादी क्र. ४ – तुकाराम भगवान लांबोरे

CIVIL JUDGE J. D.

~~अर्जदार~~/ ~~फिर्यादी~~/ वादी

गैरअर्जदार/ ~~आरोपी~~/ प्रतिवादी

सही-........................................

~~अर्जदार~~/ ~~फिर्यादी~~/ वादीचे वकील

~~गैरअर्जदार~~/ ~~आरोपी~~/ प्रतिवादीचे वकील

दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) देवगड

न्यायीक अधिकारी ( पॅनल प्रमुख )

विधिज्ञ ( पॅनल सदस्य )

CIVIL JUDGE J. D. Deogad

दिवाणी न्यायाधीश, देवगड

स्थळःदेवगड

दिनांकः१४/ ०३/२०२६